महावितरण

# शिकाऊ उमेदवार भरती शुध्दीपत्रक

अधिक्षक अभियंता, महावितरण मंडळ कार्यालय, विद्युत भवन, हिंगोली या आस्थापनेवर सन २०२६-२०२७ करीता एक वर्ष कालावधी करीता शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी वीजतंत्री ४० व तारतंत्री ४० अशी एकुण ८० पदे भरणे बाबत दि.०१.०८.२०२६ रोजी (PRO 47/2026-27) वृत्तपत्रात जाहीर निवेदन प्रसारीत करण्यात आले होते.

महावितरण कंपनीचे प्रशासकीय परीपत्रक क्र ७१२ दि.०४.०८.२०२६ अन्वये शिकाऊ उमेदवार भरती ही मंजुर पदाच्या ५ % मर्यादे प्रमाणे करणे बाबतच्या सुधारीत सुचणा प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने सदर शिकाऊ उमेदवार भरती ही ८० पदा ऐवजी सुधारीत एकुण ३२ पदावर (वीजतंत्री १६ व तारतंत्री १६ अशी एकुण ३२ ) वर केली जाणार आहे

तसेच सन २०२४-२६ या शैक्षणिक वर्षाचा मध्ये वीजतंत्री/ तारतंत्री या शाखेत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थीचा निकाल हा दि.१०.०८.२०२६ रोजी लागला असल्यामुळे सदर भरती प्रक्रिये मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी यांना अर्ज करणे करीता सदर भरतीस मुदत वाढ देण्यात येत आहे. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी दि. ०२.०९.२०२६ ते दि. ०३.०९.२०२६ (००.०० वाजेपर्यंत) www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर आस्थापना कोड E02172700057 वर ऑनलाईन अर्ज सादर करावा. दि. ०३.०९.२०२६ ( रात्री ००.०० वाजेनंतर) प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (सदर भरती प्रकरणी ज्या उमेदवारांनी दि. ०३.०८.२०२६ ते दि.०७.०८.२०२६ या कालावधीत या पुर्वी अर्ज सादर केला आहे त्यांना परत अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही त्यांचे जुने अर्ज ग्राहय धरण्यात येणार आहे)

Mahabharti.in

ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व संबंधीत कागदपत्राची (शैक्षणिक प्रमाणपत्र, आयटीआय गुणपत्रक, सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवाशी दाखला ईत्यादी साक्षाकींत सुस्पष्ट छायाकींत प्रती दि ०२.०९.२०२६ ते दि. ०४.०९.२०२६ रोजी या कालावधीत सकाळी १०.३० ते १७.०० या वेळेत उमेदवारांनी स्वतः महावितरण मंडळ कार्यालय हिंगोली येथे उपस्थित राहुन सादर करणे आवश्यक आहे. जे उमेदवार सदर कालावधीत कागदपत्रे पडताळणी करीता उपस्थित राहणार नाहीत त्यांच्या उमेदवारी अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच इतर मार्गाने सादर केलेल्या अर्जाचाही विचार केला जाणार नाही.

दि.०१.०८.२०२६ रोजी प्रसारीत करण्यात आलेल्या जाहिर निवेदनात नमुद इतर अटी व शर्ती या मध्ये इतर कोणताही बदल असणार नाही. तसेच भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास कोणतेही बदल करण्याचे किंवा संपुर्ण जाहीरात रद्द करण्याचे,नमुद पदे कमी जास्त करण्याचे तसेच भरती प्रक्रीयेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापनास राहतील.

**PRO NO NDZ-55/26-2027 dt 28/08/2026**

अधिक्षक अभियंता, महावितरण मंडळ हिंगोली